**जुलै महिन्यात करावयाची शेतीची कामे (पुणे जिल्हा) -**

ऊस –

१)आडसाली ऊसाची लागवड या महिन्यात सुरू करून १५ ऑगस्ट पर्यंत संपवा.

२)आडसाली ऊस लागवडीचे क्षेत्र कमी करा. शक्यतो आडसालीऐवजी पूर्वहंगामी ऊसाची लागवड करा.

३)पूर्वहंगामी ऊसाची लागणीचे अगोदर खरीपामध्ये सोयाबीन हे फेरपालटीचे पीक म्हणून घ्या.

४)ऊसाच्या अधिक उत्पादनासाठी आणि २५ टक्के नत्र व स्फुरद खताची बचत करण्यासाठी अँझोटोबॅक्टर, अँझोस्पिरीलम, अँसिटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू प्रत्येकी १.२५ किलो या प्रमाणात ५ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून या द्रावणात १ हेक्टरसाठी लागणारे बेणे ५ मिनीटे बुडवून लगेच लागण करा.

५)ऊसावरील पिठ्या ढेकूण (मिलीबग) च्या नियंत्रणासाठी डायमिथोएट ३० ई.सी. २६५० मि.ली. अथवा मिथील डिमेटॉन ३६५० मि.ली. अधिक २५०० ग्रॅम फिश ऑईल रोझीन सोप १००० लिटर पाण्यातून प्रतीहेक्टरी फवारावे. किंवा व्हर्टीसिलीयम लिकयानी हे बुरशीजन्य जीवाणू ४ ग्रॅम प्रती लिटर पाण्यातून किडग्रस्त पानावर १५ ते २० दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.

भात –

१)गादी वाफ्यावरील भात रोपास, रोपे १५ दिवसांनी झाल्यावर २ किलो अमोनियम सल्फेट किंवा १ किलो युरिया दर गुंठा क्षेत्रास द्या. वाफा तणविरहीत ठेवा.

२)भाताच्या रोपांची पुर्नलागण अशी करा -

अ)रोपांची पुर्णलागण करावयाच्या शेतात शेत तयार करतांना शेवटच्या नांगरणीचे वेळी हेक्टरी २-३ टन या प्रमाणात भाताचा पेंडा गाडावा. चिखलणी करते वेळी हेक्टरी २ टन या प्रमाणात गिरीपुष्पाचा पाला जमिनीत गाडावा.

आ)सुधारीत भाताच्या रोपांची नियंत्रीत लावणी पध्दत –

-सुधारीत भाताच्या २० ते २५ दिवसाच्या रोपाची नियंत्रीत लावणी करावी. त्यासाठी बांबू मार्गदर्शक किंवा सुधारीत लावणी दोरी वापरावी. बांबू मार्गदर्शक किंवा दोरीवर २५ से.मी., १५ से.मी., अशा अंतरावर खुणा कराव्यात.

-प्रत्येक खुणेजवळ चुडात ३ ते ४ रोपे लावावीत. चुडांची संख्या प्रति चौ.मी. २५ इतकी राहते.

-लावणी करताना एकाच वेळी चुडांच्या दोन ओळी लावाव्यात व प्रत्येक वेळी ४० सें.मी.

मागे जावे. असे केल्यामुळे १५ X १५ से.मी. मापाचे चुडांचे चौकोन व २५ सें.मी. चालण्याचे रस्ते (आडवे व उभे) संपूर्ण खाचरात तयार होतात.

क)युरिया डिएपी ब्रिकेटस वापरण्याची पध्दत –

-शेतक-याने कमरेभोवती बांधलेल्या प्लँस्टीक पिशवीत एक ते दिड किलोग्रँम ब्रिकेटस घ्याव्यात डाव्या कोरड्या हाताने पिशवीतून एकाचवेळी ५ ते १० ब्रिकेटस काढाव्यात.

-डाव्या हाताने एका वेळी एक ब्रिकेट उजव्या हातात टाकावी. उजव्या हाताने एका वेळी एक ब्रिकेट चार ओव्याच्या किंवा चुडांच्या (१५ X १५ सें.मी. चौकोनात) मध्यभागी ७ ते १० सें.मी. खोलीवर लावणीच्या नंतर त्याच दिवशी खोचावी.

-भात रोपाच्या पुर्नलागणीनंतर ८ ते १० दिवसांनी खाचरात निळे हिरवे शेवाळ २० किलो प्रती हेक्टरी फोकूण द्यावे.

नागली –

१)पेरणी / लागण उतारास आडवी करा. कुलथी, उडीद यांचे मिश्रण पीक घ्यावे.

२)नागली रोपांची लागण ओळीत करावी. (१५ X १० सें.मी.)

३)पेरणीपुर्वी अँझोटोबँक्टर व स्फुरद जीवाणूची २५० ग्रँम प्रती किलो बियाण्यावर बिजप्रक्रीया करावी.

बाजरी –

१)शिफारस केलेल्या पेरणीसाठी निवड करा.

-संकरीत वाण – श्रध्दा, सबुरी, शांती

-सुधारीत वाण – आय.सी.टी.पी.८२०३

२)१५ जुलैपर्यंत पेरणी करा.

३)पेरणीपुर्वी अँझोटोबँक्टर व स्फुरद जिवाणूंची प्रत्येकी २५० ग्रँम प्रती १० किलो बियाण्यावर बिजप्रक्रीया करा.

४)रासायनिक खतांचा वापर करा. पेरणीच्या वेळी एक हप्त्यात हलक्या जमिनीत ५०:२५ किलो नत्र व स्फुरद प्रती हेक्टरी द्या. मध्यम ते भारी जमिनीत ३० किलो नत्र स्फुरद प्रति हेक्टरी पेरणीच्या वेळी द्या. पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी नत्राचा ३० किलो प्रतिहेक्टरी हप्ता द्या.

भुईमूग-

१)पेरणी ७ जुलैपूर्वी पूर्ण करा. पेरणीसाठी मागील महिन्यातील कृषि संदेशाचा अवलंब करा.

२)फुले प्रगती व एस.बी. ११, फुले उनप (जे.एल.२८६) या वाणांचा वापर करा.

३)७ जुलैपर्यंत पेरणी न झाल्यास भुईमूगाऐवजी एरंडी / सुर्यफूल पीक घ्या.
४)भुईमूगावरील मुळकुजव्या व जमिनीतून उदभवणा-या इतर रोगाच्या परिणामकारक व आर्थिकदृष्ट्या फायद्याचे नियंत्रणासाठी थायरम अथवा बाविस्टीन या बुरशीनाशकाची अथवा ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ५ ग्रॅम व नत्र स्थिर करणा-या रायझोबियम आणि स्फुरद विरघळविणा-या स्फुरद जीवाणूंची प्रत्येकी २५ ग्रॅम प्रतीकिलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रीया करावी.

सोयाबीन –
१)फेरपालटीचे पीक म्हणून सोयाबीन घ्या. १५ जुलैपर्यंत पेरणी पूर्ण करा.
२)पेरणीसाठी फुले कल्याणी, एम.ए.सी.एस.१३, १२४, जे.एस.३३५, पी.के.१०२९, एम.ए.सी.एस.४५० या वाणांची निवड करा.
३)हेक्टरी ७५ ते ८० किलो बियाणे वापरा.
४)पेरणीपूर्वी हेक्टरी ५० किलो नत्र व ७५ किलो स्फुरद वापरा.
५)पेरणीपूर्वी रायझोबियम (सोयाबीन गट) व स्फुरद जीवाणूंची प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यास या प्रमाणात बिजप्रक्रीया करावी.

सूर्यफूल –
१)पेरणी १५ जुलैपर्यंत संपवा.
२)पेरणी मध्यम जमीन – ४५ X २० सें.मी., भारी जमीन - ६० X ३० सें.मी.
३)बियाणे हेक्टरी १० किलो वापरा.
४)पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात कॅप्टन किंवा कार्बेन्डॅझीम या बुरशीनाशकाची बिजप्रक्रीया करा व तदनंतर अँझोटोबॅक्टर व स्फुरद जीवाणूची प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यावर बिजप्रक्रीया करा.
५)हेक्टरी झाडांची संख्या ८०,००० ते १,००,००० ठेवा.

एरंडी –
१)हलक्या ते मध्यम जमिनीत एरंडीचे पीक घ्या.
२)सुधारीत व शिफारस केलेल्या गिरीजा, अरूणा, व्ही.आय. ९ यापैकी एक वाण पेरा.
३)पेरणीकरीता गिरीजा व व्ही.आय.९ या वाणांचे हेक्टरी १२ ते १५ किलो बी वापरा. अरुणा ह्या वाणासाठी हेक्टरी २० ते २२ किलो बी वापरा.
४)पेरणीचे अंतर गिरीजा व व्ही.आय.९ या वाणांसाठी ९० X ४५ आणि अरूणा ह्या वाणासाठी ६० X ४५ सें.मी. ठेवा.

५)३० किलो नत्र व ४० किलो स्फुरद पेरणीचे वेळी द्या. उरलेले अर्धे नत्र (३० किलो) पेरणीनंतर ४० ते ४५ दिवसांनी द्यावे.
६)पेरणीपूर्वी बियाण्यावर अँझोटोबँक्टर व स्फुरद जीवाणूची २५० ग्रँम प्रती दहा किलो बियाण्याच्या प्रमाणात बीजप्रक्रीया करा.

तूर, मूग, उडीद, कुळीथ, मटकी –
१)पेरणी १५ जुलैपर्यंत संपवा. बीजप्रक्रीया करा.
२)सुधारीत व शिफारस केलेले वाण वापरा.

कारळा –
१)कारळा पिकाची पेरणी १५ ऑगस्टपर्यंत करा. पेरणीसाठी सहयाद्री या वाणाचा वापर करा.
२)पेरणी उतारास आडवी करा.
३)पेरणीपूर्वी बियाण्यास अँझोटोबँक्टर, स्फुरद जीवाणूची बिजप्रक्रीया करा.
४)बियाण्यात १:३ या प्रमाणात वाळू मिसळून पेरणी करा.
५)पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करा. दोन रोपातील अंतर १० सें.मी. ठेवा.
६)पेरणीचेवेळी प्रतिहेक्टरी १० किलो नत्र द्या.

पीक पध्दती –
१)अवर्षण विभागात कोरडवाहू शेतीमध्ये खरीप हंगामात मध्यम खोल जमिनीसाठी तूर + गवार १:२ या पीक पध्दतीशी शिफारस करण्यात येत आहे. यासाठी तूरीच्या दोन ओळीतील अंतर ९० सें.मी. व दोन रोपाताल अंतर २० सें.मी. ठेवावे. तूरीच्या दोन ओळीमध्ये ३० सें.मी. अंतरावर भाजीसाठी गवारीच्या दोन ओळी पेराव्यात. पेरताना मधला फण बंद करून त्यास मोगणा जोडून तूर पेरावी व बाजूच्या दोन फणांचा उपयोग गवार पेरण्यासाठी करावा.
२)आवर्षणप्रवण विभागात हलक्या जमिनीतून अधिक उत्पादनासाठी बाजरी + तूर (२:१) अथवा बोर ५ X ५ मीटर + मटकी ८ ओळी या आंतरपीक पध्दतीचा अवलंब करावा.
३)अवर्षण प्रवण विभागात सिंचनाखाली शेतीपासून जास्तीतजास्त निव्वळ नफा मिळण्यासाठी एप्रिल महिन्यात शेवंती लागवड करून किंवा खरीप हंगामात झेंडू पीक घेवून रब्बी हंगामात कांद्याची लागवड करावी.
४)वर्षभर हिरवा चारा मिळण्यासाठी अवर्षण प्रवण विभागातील बागायत क्षेत्रावर खरीपामध्ये ज्वारी (रुचिरा) रब्बीमध्ये बरसीम (वरदान) व उन्हाळी हंगामामध्ये बाजरी

(जायंट बाजरी) ही पीक पध्दती व या पीक पध्दतीत शिफारस केलेल्या रासायनिक खताच्या मात्रेच्या ७५ टक्के नत्र, स्फुरद व पालाश खरीप (ज्वारी ७५ : ३७.५ : ३७.५ किलो प्रती हेक्टरी) व रब्बी (बरसीम १२ : ७० : २२ किलो प्रती हेक्टर) पीकास अधिक खरीपात तसेच रब्बीत प्रत्येकी १० टन शेणखत प्रती हेक्टर द्यावे व उन्हाळी बाजरीस कोणतेही खत देऊ नये.

पीक संरक्षण संदेश –

भात –

१)खेकडा – अँसिफेट ७५ डब्ल्यू.पी.किंवा ५० डब्ल्यू.पी. किंवा मिथील पँराथिऑन ५० इ.सी.चे विषारी अमिष तयार करावे. त्यासाठी अँसिफेट, ५०० ग्रँम, कार्बारील १०० ग्रँम अथवा मिथील पँराथिऑन १०० मि.ली. १ किलोग्रँम शिजवलेल्या भातामध्ये मिसळून लहान लहान गोळ्या तयार कराव्यात आणि प्रत्येक बिळामध्ये एक गोळी ठेवावी.

२)खोडकीडा –

-कीड प्रतिबंधक आय.ई.सी. ७५७५, ७५६८ या जाती वापराव्यात.

-भात पिकाची पुर्नलागण लांबवू नये.

-रोपवाटीकेमध्ये पेरणीनंतर १५ दिवसांनी फोरेट १० टक्के किंवा क्विनॉलफॉस ५ टक्के ३ व १० किलो प्रति हेक्टरी वापरावे अथवा ४ ट्रायकोकार्ड प्रतीहेक्टरी वापरावेत.

भुईमूग –

मावा – खाली नमूद केलेली किडनाशके किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच फवारावीत किंवा धुरळावीत. पहिली फवारणी किंवा धुरळणी झाल्यानंतर १५ दिवसांनी दुसरी फवारणी किंवा धुरळणी करावी. फॉस्फँमिडॉन २० मि.ली. किंवा रोगार ५०० मि.ली. किंवा मिथील डिमेटॉन ४०० मि.ली. किंवा मोनोक्रोटोफॉस ४०० मि.ली. ५०० लिटर पाण्यात किंवा मँलेथिऑन ५ टक्के भुकटी किंवा फॉसेलॉन ४ टक्के भुकटी २० किलो प्रतिहेक्टरी धुरळणी करावी अथवा ५ टक्के निमअर्क फवारावा.

कापूस –

कापसावरील बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा व्हीरीडी ०.२ टक्के पेरणीनंतर ३०, ४५ व ६० दिवसांनी तीन वेळा फवारावे.

वाटाणा –

शेंगा पोखरणारी अळी – खाली नमूद केलेल्या किटकनाशकापैकी एकाची फवारणी किंवा धुरळणी किडींचा प्रादुर्भाव दिसून येताच करावी. फॉस्फँमिडॉन १२० मि.ली., मिथील

डिमेटॉन ४०० मि.ली. ५०० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी फवारणी करावी. अथवा एच.एन.पी.व्ही. विषाणू २५० एल.ई. प्रतिहेक्टरी फवारावे.
मावा – मॅलेथिऑन ५ टक्के भुकटी अधिक कार्बारील १० टक्के भुकटी २ किलो धुरळणी करावी. दुसरी धुरळणी पेरणीनंतर ३ आठवड्यांनी करावी. अथवा ५ टक्के निमअर्क फवारावा. अथवा कार्नियाच्या १० ते १५ हजार आळ्या प्रतीहेक्टरी सोडाव्यात.

श्रावणघेवडा –
खोडमाशी – पेरणीनंतर १५ दिवसांनी क्विनॉलफॉस २५ इ.सी. १००० मि.ली. अथवा मोनोक्रोटोफॉस ७०० मि.ली. ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा. दुसरी फवारणी किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास पहिलीनंतर १५ दिवसांनी करा.

हळद व आले –
कंदमाशी – जुलैमध्ये माशी दिसताच खालीलपैकी कोणतेही एक किडनाशक जमिनीत मिसळावे व त्यानंतर हलके पाणी द्यावे.
१)१० टक्के दाणेदार फोरेट – थिमेट – २० किलो प्रतिहेक्टर
२)कार्बारील १० टक्के भुकटी – २० किलो प्रतिहेक्टर
३)५ टक्के दाणेदार क्विनॉलफॉस – २० किलो प्रतिहेक्टर किटकनाशकाचे ३ हप्ते महिन्याच्या अंतराने द्यावेत.

वनस्पती रोगशास्त्र –
१)भात रोपावरील करपा रोग नियंत्रणासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून उगवण झाल्यानंतर १५ दिवसांनी कार्बेन्डॅझीम ०.१ टक्के किंवा मॅन्कोझेब ०.२५ टक्के किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ०.२५ टक्के अधिक स्टिकर ०.१ टक्के यांची एक फवारणी करावी.
२)भुईमूग, तूर व इतर कडधान्ये पिके पेरणीपुर्वी बुरशीनाशकाची व रायझोबियम जिवाणू खताची प्रक्रीया करावी. थायरण किंवा कॅप्टन ४ ग्रॅम व त्यानंतर रायझोबियम २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यावर प्रक्रीया करावी.
३)टोमॅटो, वांगी, मिरची या पिकांमधील रोप अवस्थेतील करपा रोग नियंत्रणासाठी रोपे १५ दिवसांची झाल्यानंतर क्लोरोथॅलोनील ०.२ टक्के किंवा मॅन्कोझेब ०.२५ टक्के अधिक स्टिकर ०.१ टक्का यांची फवारणी करावी. तसेच पुनर्लागण करताना रोपे वरील द्रावणात बुडवून लावावीत.
४)मृगबहार डाळींबावरील पान व फळावरील ठिपके तसेच पेरूवरील देवी रोग नियंत्रणासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून बोर्डोमिश्रण १.० टक्का किंवा कार्बेन्डॅझीम ०.१ टक्का अधिक

मॅन्कोझेब ०.२०टक्के अधिक स्टीकर ०.१ टक्का यांची दर दहा दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.

५)पेरूवरील देवी रोग नियंत्रणासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून प्रोपिकोनेझॉल ०.१ टक्का अथवा कार्बेन्डॅझीम ०.१ टक्का किंवा अधिक मॅकोझेब ०.२० टक्के यांची दर १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. पहिली फवारणी फळधारणा झाल्यानंतर करावी. त्याचप्रमाणे बागेत स्वच्छता ठेवावी.

६)सर्व फळपिकांमध्ये विविध रोग नियंत्रणासाठी करावयाचे उपाय –

-बागेत पावसाचे पाणी आल्यास साचणार नाही याची काळजी घ्यावी.

-जास्त पाणी बागेबाहेर काढून द्यावे.

-बागेतील तण वेळचेवेळी काढून टाकावेत.

-रोगट फळे झाडावरच न ठेवता ती तोडून त्याचा नाश करावा.

-झाडाभोवती २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा टाकून माती हलवून घ्यावी.

-वर सांगीतल्याप्रमाणे बुरशीनाशकांची स्टिकर ०.१ टक्का घालून वेळच्यावेळी फवारणी करावी.

फळबागा –

१)सर्व फळझाडांची लागवड करा. फळांना व रोपांना आधार द्यावा.

२)मृगबहार धरलेल्या फळझाडांवर औषध फवारणी करावी व खते द्यावीत.

३)केळीची लागवड करावी. रोपांची निवड खात्रीलायक ठिकाणाहून करावी.

४)टीश्युकल्चर तसेच कंदाची निवड निरोगी व अधिक उत्पन्न देणा-या बागेतून करावी.

भाजीपाला –

१)टोमॅटो, वांगी, मिरची रोपांची पुनर्लागण करावी. लागण करतेवेळी शिफारशीप्रमाणे अँझोटोबॅक्टर व स्फुरद जीवाणू द्रावणाची मुळावर प्रक्रीया करा. पिकसंरक्षण आणि खताची मात्रा द्यावी.

२)पालेभाज्यांमध्ये मेथी, पालक, शेपू आणि कोथिंबीर यांची लागवड करावी.

३)भेंडीची अर्का अनामिका जातीची निवड करून लागण करावी.

४)उन्हाळी भाजीपाल्याची काढणी करून प्रतवारी करून विक्रीस माल बाजारात पाठवावा.

फुलझाडे –

१)शेवंतीची सोनालीतारा, आय.आय.एच.आर. सिलेक्शन ४ या जातीची निवड करून शिफारशीप्रमाणे लागवड करा.

२)गुलाबाच्या ग्लॅडीयटर, पॉपलर इ. जातीची निवड करून लागवड करा. तसेच खरड छाटणी करून पिकसंरक्षण करा.

३)पावसाळी हंगामातील फुलझाडांची लागवड करा.

४)ग्लॅडीओलसच्या सुधारीत जातीची निवड करून ताम्रयुक्त औषध ३ टक्के प्रक्रीया करून लागवड करा.

५)हंगामी फुलझाडे – अॅस्टर, ग्लॅर्डीया, झेंडू, इ. पिकांची रोपे तयार करण्यासाठी बी पेरावे.

६)मे-जून मध्ये लागवड केलेल्या गुलछडी व शेवंती पिकास अनुक्रमे ७० किलो प्रती हेक्टर आणि १०० किलो प्रती हेक्टर या प्रमाणात नत्राचा पहिला हप्ता द्यावा.

७)शेवंती पिकाचे मुळकुजव्या या रोगापासून संरक्षण करण्यासाठी पावसाच्या पाण्याचा निचरा करून घ्यावा, तसेच कॉपर-ऑक्सी-क्लोराईडचे ०.५ टक्के तीव्रतेच्या द्रावणाचे ड्रेंचिंग मुळाजवळ करावे.

८)निशिगंध व शेवंती वरील करपा रोगाकरीता कॉ.ऑ.क्लो.(सी.ओ.सी) ०.२५ टक्के अथवा मॅन्कोझेब ०.२ तीव्रतेचे द्रावण दर १५ दिवसांनी फवारावे.

९)गुलाबावरील करपा नियंत्रणासाठी कॉ.ऑ.क्लो.(सी.ओ.सी) ०.२५ टक्के अथवा टिल्ट ०.५ टक्के तीव्रतेचे द्रावण दर आठ दिवसांनी फवारावे.

१०)हरीतगृहातील जरबेरावरील करपा नियंत्रण करण्यासाठी बेनोमिल ०.१ टक्के अधिक मॅन्कोझेब ०.२ टक्के आठ दिवसाच्या अंतराने फवारावे.

११)औषध फवारणी करताना स्टीकर १० मि.ली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात वापरावे.

पशूसंवर्धन -

१)पावसाळ्यापुर्वी जनावरांना खालील रोगांसाठी प्रतिबंधक लस टोचून घ्यावी.

-फ-या – अॅलम प्रेसिपिटेड व्हॅक्सीन – तुरटीयुक्त लस

-घटसर्प – ऑईल अॅडज्युव्हंट एच.एस.व्हॅक्सीन तैलयुक्त लस

-बुळकांड्या – टिश्यु कल्चर रींडर पेस्ट

२)पावसाळ्यात ओल्या आणि कोवळ्या हिरव्या चा-याचे प्रमाण अधिक असल्याने जनावरांना योग्य त्या प्रमाणात हिरवा चारा खाऊ घालावा म्हणजे जनावरांना पोटफुगी होणार नाही.

३)पावसाळ्यात गढूळ पाण्याचे प्रमाण अधिक असल्याने जनावरांना हगवण होणार नाही.

विशेष संदेश –

१)सर्व पिके वेळेवर आंतरमशागत करून तणविरहीत ठेवा.

२)वेळेवर पीक संरक्षण करा.

३)लवकर पेरलेल्या पिकास शिफारशीप्रमाणे वरखतांचा हप्ता द्या.

**Recommended field operations to be carried out in month of July**

**Sugarcane –**
1)Start planting adsali Sugarcane in this month and complete by the 15th August.
2)Bring down the area under adsali sugarcane cultivation possibly cultivate the preseasonal sugarcane instead of Adsali.
3)Take Soyabean as rotational crop before planting of Preseasonal Sugarcane.
4)To Achive higher yields of Sugarcane and to bring 25% saving in N and plant the Sugarcane sets by dipping in 100 liter solution of Azotobacter, Azospirillum, Acetobacter and PSB each 1.25kg for five minutes.
5)To control the mealy bugs on Sugarcane crop spray the crop with dimethoate 30EC 2050ml or methyl dematon 3650 ml + 2500ml fish oil Rosin soap mixed in 1000 liter of water for one hectare area or release 1500 eg or adults of crytolemus paracitic insect for one hectare area or carryout 2 spraying of verticillium lecanae @ 4gm per liter liter of water with 15 – 20 days interval.

**Paddy –**
Provide the Paddy seedings which are grown on raised bed with 2kg ammonium sulphates or 1kg urea per guntha area 15 days after sowing keep Bed weedfree.

A)Dump Paddy straw @ 2.3 ton/ha while preparing the field for paddy cultivate at the time of last ploughing. At the time puddling dump 2 tons of Glyricidia leaves in the soil

B)Improved controlled transplanting system of rice.
-To implement this system are bamboo stick as a guide or improved transplanting when seedling attains 20 – 25 days age. Do markings on bamboo guide or on rope at distance of 25cm, 15cm,
-At each marking transplant 3 – 4 seedlings. The population of plantlets remains 25 per square centimeter.
-While transplanting plant too lines at a time, and each time go back with 40 cm distance. This enables to make square of 15 X 15 cm. and walking street of 25cm (horizontal, verticle)

C)Method of using urea brickets
-In this method farmers are supposed to take 1 – 1.5kg of brickets in a plasticbag and then that bag is tied around the back. Take out 5 – 10 brickets at a time with the help of left hand which is dry.
-Send one bricket at a depth of 7 – 10cm exactly in the centre of square (15 X 15cm square) with the help of right hand.
-Broadcast Blue green algae @ 20 kg 1ha.in between the space 8-10 days after transplanting.

**Nagli –**
-Sowing transplanting should be done parallel to slope. Take Kulthi, Udid as intercrops.
-Transplant Nagli seedlings in line (15 X 10 cm)
-Treat the seeds with azotobacter and PSB @250 gm per 10 kg seed.

**Bajra –**
1)Choose recommended varieties for sowing.
Hybrid – Shraddha, Saburi, Shanti,
Improved Variety – ICTP.8203
2) complete the sowing by 15th of July.
3) Treat the seeds with azotobacter and PSB @ 250 gm each per 10 kg of seed before sowing.
4) Provide the crop with chemical fertilizers. In light soil give 50:25kg N and P/ ha. At the time of sowing. Provide the crop with 30 kg N as a second dose at 25-30 days after sowing.

**Groundnut –**
-Complete the sowing before 7th July.
-Use Phule, Pragati, S.B-11, Phule Unap(J.L.286)
-It sowing is not completed before 7 july take castor or sunflower instead of groundnut.
-To control root rot of groundnut and to manage other soil born disease effectively and economically treat the seed before sowing with Thirum or Bavistin or Trichoderma 5gm and Rhizobium, PSB 25gm each for one kg of seed.

**Soybean –**
1)Take soyabean as rotational crop complete the sowing before 15th July.
2)Choose Phule kalyani, MACS-13, 124, J.S.-335, P.K-1029, MACS-450 varieties to sow soyabean.
3)Use 75-80 kg of seed one ha. Area.
4)Use 50 kg N and 75kg P /ha. Before sowing.
5)Treat the seeds with rhizobium (Soyabean group) sowing @ 250 gm per 10 kg of seed.

**Sunflower –**
1)complete the sowing before 15th of July.
2)Spacing – medium soil- 45 – 20 cm, Heavy soil – 60 X 30cm.
3)Use 10 kg seed per ha.
4)Treat the seeds with captan or carbendazim fungicide @ 2 gm per kg of seed. After this treatment treat the seed with azotobacter and PSB @ 250 gm per 10 kg of seed.
5)Maintain 80,000 to 1,00,000 plant population.

**Castor** –
1)select light to medium soil to sow the castor.
2)Sow any one improved and recommended variety out of Girija, Aruna, V.I.G.
3)Use 12-15 kg of seed per hectare of Girija and V.I.G. varieties. For Aruna use 20-22 kg/ ha seed.
4)Spacing Girija and V.I.G.- 90 X 45cm.
Aruna – 60 X 45 cm
5)Provide the crop with 30 kg N and 40 kg P at the time of sowing. Remaining half N should be given at 40-45 days after sowing.
6)Treat the seeds with Azotobacter and P.S.B. @ 250 gm each per 10 kg of seed before sowing.
Redgram, Greengram, Blackgram, mothbean,

**Kulthi** –
1)complete the sowing by the 15th of July. Carryout seed treatment.
2)Use improved and recommended varieties

**Niger** –
1)Complete the sowing of niger crop by 15th of august. Use Sahyadri variety for sowing.
2)Sowing should be done across the slope.
3)Treat the seeds with azotobacter PSB before sowing.
4)Sow the seed by mixing sand at 1:3 proportion.
5)Carryout thinning 15 days after sowing maintain 15cm distance between two plants.
6)Provide 10 kg of N/hat at the time of sowing.

**Crop systems** –
1)in dryland agriculture of droughts prone area, in Kharif season Redgram + Clusterbean 1:2 crop system is recommended for medium to deep soils for this maintain 90cm spacing in between two rows and 20cm spacing in between two plants of Redgram in between two lines of Redgram at the spacing of 30cm sow two lines of cluster bean. At the time sowing block middle pole and sow Redgram and use other two poles for sowing of Redgram.
2)To achieve higher production in light soil of drought prone zone adopt Bajra + Redgram (2:1) or ber 5 X 5m + mothbean 8 lines intercrops.
3)To obtain maximum net profit in drought prone zone under irrigated conditions plant shevanti in the month of April, or take marigold as a Kharif crop followed by onion as a Rabi crop.
4)To obtain green fodder for whole year in drought prone area under irrigated conditions follow Jowar ( Ruchira ) Kharif, berseem (Vardan) in Rabi and Bajra (Giant Bajra) in summer reason, crop system. In this crop system 75% of N.P.K. to the recommended doses of fertilizers is to be given to Kharif (Jowar

75:37.5:35.5kg / ha) Rabi (Berseem12:17:20kg / ha) MOP. In Kharif and Rabi 10 Tons of FYM / ha should be given and summer Bajra should not befertilized.

**Crop Protection Message –**

Paddy –

1)Crab – Prepare poison bait of Acephate 75 W.P. or carbaryl 50 wp or methyl parathion 50 EC. Mix Acephate 500gm, Carbaryl 100 gm or methyl parathion 100ml in 100gm cooked rice, small balls and keep one ball in each hole.

2)Stem borer –

-Use IEC – 7575, 7568 varieties which are resistance to stem borer.

-Do not extend the transplanting of rice.

-In nursery 15 days after transplanting apply 3 kg 10% phorate, or 10 kg, 5 % quinolphos for one hectare area or use 4 trichocards for one ha. Area.

**Groundnut** – Immediately after incidence of pests spray of dust pesticides as mentioned below. Carryout first and second spraying / dusting with a gap of 15 days. Phosphomidon 120ml or Rogar 500ml or 400 ml methyl dematon or monocrotophos 400ml mixed in 500 liters of water or dust 5 % malathion or phoselon 4 % powder @ 20 kg /ha or spray 5 % Neem extract.

**Cotton** – To control the fungal blight or anthracnose on cotton spray the crop with 0.2% trichoderma viridae at 30, 45 and 60 days after sowing.

**Pea** – Spray, or dust any one of the following insecticide immediately after attack of the phosphomidon 120ml methyl dematon 400ml, Thimeton 400 ml / ha. Mixed in 500 litres of water, or spray HNPV 250 LE / ha.

Aphids – Dust the crop with malathion 5% dust or carbaryl 10 % @ 2 kg / ha. Second dusting should be carried out 3 weeks after sowing or spray 5 % neem extract or release 10-15 Thousand larvae of Crysoperla Carnae / ha. Area.

**French bean –**

Carryout spraying of quinolphos 25 EC 1000 ml or monochrotophos 700ml mixed in 500 liter water 15 days after sowing. If incidence of pest starts appearing on the crop then take second spray at 15 days after first spraying.

**Ginger and Turmeric –**

Rhizome fly- In the month of July when fly starts appearing mix one of the following insecticides in the soil and provide light irrigation to the crop.

1)10 % phorate granules – 20kg / ha.

2)10 % Carbaryl powder – 20 kg / ha.

3)5 % quinolphos granules – 20 kg / ha.Give 3 doses with a gap of month.

**Plant Pathology –**

1)To control blight of paddy take a spray of carbendazim 0.1 % or mancozeb

0.25 % or copper oxychloride 0.25 % + 0.1 % sticker as a preventive measure at 15 days after germination.
2)Groundnut, Redgram and other Pulses should be treated with fungicides and rhizobium culture before sowing Thirum or captan 4gm and then rhizobium 25gm per kg seed should be treated.
3)Carryout spraying on Tomato, Brinjal, Chilli crops to control the early blight when seedling attains15 days. For that spray chlorothalonnil 0.2 % or mancozeb 0.25% + sticker 0.1 likewise transplant the seedlings by dipping in the solutions of above fungicide at the time of transplanting
4)To control the leaf and fruit spot disease of Mrugbahar Pomegranate and anthracnose of Guava take spray as a preventive measure of bordo mixture 1 % or carbendazim 0.1 % + Mancozeb 0.20 % + Sticker 0.1 % with a interval of 10 days.
5)To control the anthracnose disease on Guava take a spray propiconazole 0.1 % Carbendazim 0.1 or + mancozeb 0.20 % as preventive measure with a interval of 15 days first spraying should be carried out during fruit setting. Likewise cleanliness in garden.
6)Control measures to be followed to control different disease
-Care of all fruit crops be taken that rain water should not be stagnated – Drain out excess water from garden.
-Remove all the weeds timely.
-Pick and destroy the diseased fruits instead of keeping them tree.
-Add 25 gm trichoderma in the soil near to the basin and then pulverize soil.
-While spraying add 0.1 % sticker.

**Krishi Vigyan Kendra,**
**Baramati.**

---------------------------------------------